ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, २० मे, १९६४ | अंक १०

## विविध माहिती

**संरक्षण साहित्याचें उत्पादन**—आवडी येथील रणगाडे तयार करण्याच्या कारखान्यांत पुढील वर्षापासून रणगाडे तयार होऊं लागतील. कारखान्याच्या उभारणीसाठी ७६ कोटी रुपये खर्च झालेला आहे. कारखान्यांत प्रथम मध्यम वजनाचे रणगाडे तयार करण्यांत येणार आहेत. त्यांचें वजन २० ते ४० टनांपर्यंत असेल. प्रत्येक रणगाडा तयार करण्यास सुमारें १० लाख रुपये लागतील. सुरवातीला १०० रणगाड्यांची जुळवाजुळव करण्यांत येईल.

**शेतीसाठी यंत्रसामग्रीचा करार**—राजस्थानांत जेतसर ह्या ठिकाणीं काढण्यांत यावयाच्या विस्तृत शेतीसाठी आधुनिक यंत्र-सामग्री देण्याचें रशियानें कबूल केलें आहे. आग्नेय आशियांत विस्ताराच्या बाबतींत ह्या शेतीचा दुसरा क्रमांक लागेल. सुरतगढ येथील शेतीचा क्रमांक पहिला लागतो. जेतसर येथील मोठी शेती टप्प्यानें कार्यप्रवण करण्यांत येणार आहे. त्यांपैकीं पहिल्या टप्प्यासाठी रशियाकडून ६ लाख रुपयांची यंत्रसामग्री मिळणार आहे.

**न्यूयॉर्कमधील प्रदर्शनांत चोऱ्या**—न्यूयॉर्कमध्यें भरविण्यांत आलेल्या जागतिक प्रदर्शनांत भाग घेतलेल्या अनेक देशांच्या दालनांतून चोऱ्या झाल्या आहेत. सुदानच्या दालनांतून पुरुषांचे अंगरखे आणि शहामृगाचें रंगविलेलें अंडें चोरीला गेलें. पाकिस्तानच्या मंडपांत रेशमी तलम साड्या विणणारा एक माग ठेवलेला होता. त्यांतील धोटाच चोरीला गेला. अखेर कराचीहून विमानानें नवा धोटा आणवावा लागला. पश्चिम जर्मनीच्या दालनांतून दर आठवड्याला १०० पौंडांच्या वस्तूंना पाय फुटलेले आढळून आले.

**जपानसाठी बिहारमधील केळीं**—बिहारमधून लाख, अभ्रक आणि ताग ह्या पदार्थांची परदेशीं निर्यात करण्यांत येते. परदेशीय चलन मिळविणाऱ्या ह्या पदार्थांच्या यादींत आतां केळ्यांची भर पडणार आहे. उत्तर बिहारमधील हाजीपूर येथें पिकणारीं केळीं जपानला निर्यात करण्याचे प्रयत्न होणार आहेत. केळ्यांच्या तेथील लागवडीची पाहाणी करण्यासाठी जपानमधील दोन बागाईतदार तज्ज्ञ भारतांत येणार आहेत.

**एक हजार किलोवॅट शक्तीचा ध्वनिक्षेपक**—रशियानें एक हजार किलोवॅट शक्तीचा प्रभावी ध्वनिक्षेपक भारताला विकण्याचें कबूल केलें आहे. हा ध्वनिक्षेपक मध्यम लहरीवर चालणारा असेल आणि त्याची किंमत रुपयाला चलनांत देण्यांत येणार आहे. त्याच्या उभारणीसाठी किती खर्च येईल ह्याचा अंदाज लागलेला नाहीं. परंतु तो १ कोटी रुपयांच्या घरांत जाईल. उभारणीचें काम रशिअन तंत्रज्ञ करणार आहेत. १९६५ अखेर अगर १९६६ आरंभीं काम पूर्ण होईल असा अंदाज आहे.

**ब्रह्मदेशाला कोळशाचा पुरवठा**—ब्रह्मदेशाला कोळसा पुरविण्याचा तीन वर्षें मुदतीचा करार भारतानें केला आहे. पुरवठ्याच्या करारांतील शर्तीप्रमाणें भारत ब्रह्मदेशाला दरसाल २ लाख ८० हजार टन कोळसा पुरविणार आहे. कोळशाची किंमत सुमारें ४·५ कोटी रुपये होईल ह्या करारामुळें भारत व ब्रह्मदेश ह्यांच्यातील व्यापारांत भारताच्या बाजूनें असणारी प्रतिकूल तफावत कमी होण्यास मदत होणार आहे.

**कोपरगांव सहकारी साखर कारखाना**—कोळपेवाडी येथील कोपरगांव सहकारी साखर कारखान्यानें ह्या वर्षीच्या गळिताच्या हंगामांत १ लाख ७४ हजार टन ऊस गाळून २ लाख ७ हजार साखरेच्या पोत्यांचें उत्पादन केलें. कारखान्यानें ८ वर्षांपूर्वी इंडस्ट्रिअल फॉयनॅन्स कॉर्पोरेशनकडून ४० लाख रुपयांचें भांडवल कर्जाऊ घेतलें होतें. तें व राज्यसरकारचें १० लाख रुपयांचें कर्ज कारखान्यानें फेडून टाकलें आहे.

**मद्यपान, सामाजिक प्रतिष्ठेचें गमक**—दारूबंदीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या टेकचंद कमिटीच्या मतानें मद्यपान करणें ही गोष्ट संपन्नतेची व प्रतिष्ठितपणाची गमक मानली जाऊं लागली आहे. आदरातिथ्य करण्याची एक पद्धत म्हणून आणि सामाजिक स्थानाची खूण म्हणून मद्यमान रूढ झाल्यास त्याचे परिणाम गंभीर होतील असा इशारा कमिटीनें दिला आहे. मद्यपानाला लाभलेल्या सामाजिक प्रतिष्ठेला खालीं खेचले पाहिजे अशी सूचना कमिटीच्या अहवालांत करण्यांत आली आहे.

**हिंदी वैद्यद्वयांचा गौरव**—जामनगर येथील आयुर्वेदिक संशोधनकेंद्राचे संचालक डॉ. आर. एच. पाठक ह्यांना सीलोन सरकारनें बंदरनायके संशोधन संस्थेचे संचालक म्हणून नेमले आहे. ह्या संस्थेचें उद्घाटन १९६२ सालीं पं. नेहरू ह्यांच्या हस्तें झालें होतें. सीलोनमध्यें आशिआई आयुर्वेद संशोधन केंद्र स्थापन करण्यांत येणार असून केंद्राचे प्रमुख म्हणून डॉ. शिवशर्मा ह्या आयुर्वेदिक तज्ज्ञाची नेमणूक करण्यांत आली आहे.

**सर्कसमधील खेळाडूंचा विमा नाहीं**—सर्कसमधील निरनिराळ्या प्रकारच्या खेळांत कसरतीचीं कामें करणाऱ्या खेळाडूंचा विमा उतरण्यास आयुर्विमा कॉर्पोरेशन तयार होत नाहीं. स्वतःचा योगक्षेम चालविण्याचा त्यांचा व्यवसाय हा नेहमींच जोखमीचा आणि धोक्याचा असतो. कामें करतांना त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यांत येत असली तरीसुद्धां धोका मुळांतच टाळता येण्यासारखा नसतो. परिणामी त्यांना आयुर्विम्याचें संरक्षण मिळत नाहीं.

## राजप्रतिनिधींच्या सवलतींबद्दल नवा कायदा

एकेकाळीं ब्रिटनच्या साम्राज्याची राजधानी असलेल्या व आतां कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील प्रमुख देशाची राजधानी असलेल्या लंडन शहरांत परदेशीय प्रतिनिधींची बरीच संख्या असते. लंडन शहरांत निरनिराळ्या देशांतून आलेले असे ७,५०० लोक आहेत. परदेशांचे प्रतिनिधि म्हणून त्यांना कांहीं खास सवलती असतात; त्यामुळें नेहमींच्या कायद्याच्या बंधनांतून ते कांहीं प्रमाणांत मुक्त असतात. परंतु ह्या परिस्थितीचा दुरुपयोग करण्यांत येऊं लागल्यामुळें ब्रिटननें परदेशीय प्रतिनिधींबाबत नवा कायदा करण्याचें ठरविलें आहे. कांहीं परदेशीय नागरिक प्रतिनिधींनीं गुन्हे करून ते आपल्या खास सवलतींच्या जोरावर पचविण्याचा प्रयत्न केल्यामुळें हा कायदा करणें आवश्यक वाटत आहे. गुन्हा करावा आणि आपल्या खास अधिकारांचा फायदा घ्यावा, असे प्रकार अलीकडे वाढत चाललेले होते. त्यामुळें पोलिसांना आणि रहदारीचें नियंत्रण करणाऱ्या रक्षकांना स्वतःचें काम करणें कठीण होत चाललें होतें. नव्या कायद्याप्रमाणें परदेशीय वकिलातींमधील कारभार पाहणारा नोकरवर्ग आणि तांत्रिक कामें करणारे नोकर ह्यांना खास सवलती मिळणार नाहींत. त्यांनीं कामाच्या कक्षेबाहेर केलेल्या कृत्यांची जबाबदारी त्यांना टाळतां येणार नाहीं. अलीकडेच एका देशाच्या प्रतिनिधीनें लंडनच्या हॉटेलमधील मोठा पिआनो खिडकींतून खालीं टाकला. तो एकाच्या मोटारगाडीवर पडून तिची मोडतोड झाली. पण, मोटारीच्या मालकाला नुकसानभरपाई मिळूं शकली नाहीं. कारण, ह्या प्रतिनिधीवर कायद्याप्रमाणें खटला भरतां येत नव्हता. परदेशीय राजप्रतिनिधींच्या खास हक्कांबद्दलचा पहिला कायदा ब्रिटनमध्यें सन १७०८ मध्यें करण्यांत आला होता.

---

## बोकॅरो पोलाद-कारखाना उभारण्यास मदत

बोकॅरो येथें काढण्यांत यावयाच्या पोलाद कारखान्याची उभारणी करण्यासाठी सोव्हिएट रशिआनें १०० कोटी रुपयांचें कर्ज देऊं केलें आहे. संकल्पित कारखान्याचा पहिला टप्पा पूर्ण करण्यासाठी जो परदेशीय चलनांतील खर्च करावा लागेल तो वरील कर्जातून करण्यांत यावयाचा आहे. कारखान्याचा विस्तार करून त्याची उत्पादनक्षमता ४० लाख टनांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे. पहिला टप्पा पूर्ण झाला म्हणजे दरसाल १५ लाख टन पोलादाची निर्मिती होऊं लागेल. कारखान्याच्या विस्तारासाठी लागणारी यंत्रसामग्री देशांतच तयार करण्यांत येणार आहे. रशिआच्या मदतीनें रांची येथें जो भारी यंत्रसामग्रीचा कारखाना स्थापन करण्यांत आला आहे त्याची ह्या कामीं चांगली मदत होईल. बोकॅरो येथें काढण्यांत यावयाच्या कारखान्यासाठी अमेरिकेकडून मदत मिळविण्याचा प्रयत्न भारत सरकारनें केला होता. प्रे. केनेडी ह्यांच्या सरकारनें कारखान्यासाठी कर्जाचा पहिला हप्ता म्हणून ५१·२ कोटी डॉलर्स देण्यांत यावेत अशी शिफारसहि केली होती. परंतु, अमेरिकन काँग्रेसनें भारतांत सार्वजनिक मालकीच्या विभागांत निघणाऱ्या कारखान्यास सरकारी पातळीवर मदत देण्यास नाखुषी दर्शविली. नंतर खुद्द भारतानेंच मदतीची मागणी मागें घेतली. इजिप्तमधील आस्वान धरण बांधण्यासाठी मदत देण्यासहि अमेरिकेनें अशीच खळखळ केली होती, आणि अखेर तें धरण रशिआच्या मदतीनें बांधण्यास सुरुवात झाली. आर्थिक मदत देण्याच्या बाबतींत रशिआ अमेरिकेपेक्षा अधिक तत्पर असतो असा ग्रह आफ्रिका व आशिआ खंडांत पसरूं लागला आहे.

## खासगी पोलादाच्या कारखान्यांना मदत

हिंदमधील खासगी मालकीच्या पोलाद कारखान्यांनीं आपआपला विस्तार करण्याच्या योजना आंखल्या आहेत. ह्या कामीं त्यांना जागतिक बँकेकडून लवकरच २७ कोटी रुपयांचीं कर्जें मिळण्याची शक्यता आहे. त्यांपैकी सुमारें १८ ते २० कोटी रुपयांचें कर्ज टाटा कंपनीच्या विस्ताराच्या योजनेसाठी करावयाच्या प्राथमिक कामासाठी देण्यांत येणार आहे. योजना पूर्ण झाल्यावर कंपनीचें उत्पादन २० लाख टनांवरून ३० लाख टनांपर्यंत वाढेल. दुसरें ६ ते ७ कोटी रुपयांचें कर्ज इंडिअन आयर्न कंपनीच्या विस्ताराच्या कार्यक्रमासाठी देण्यांत येणार आहे. विस्ताराच्या योजना ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत पार पडतील.

---

## हवा सुखद राखण्यासाठी झालेला खर्च

मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांच्या कचेऱ्या आणि राहण्याच्या जागा ह्यांतील हवा सुखद राखण्याच्या उपकरणावर १९६२-६३ सालीं २७ लाख रुपये खर्च करण्यांत आले. १९६१–६२ सालीं ह्या बाबीवर २२ लाख रुपये खर्च करण्यांत आले होते. ह्या बाबीवर करण्यांत येणारा खर्च कमी करण्याचे प्रयत्न होत आहेत. मध्यवर्ती सरकारच्या डेप्युटी सेक्रेटरींना ह्या बाबतींत मिळणाऱ्या सवलती रद्द करण्यांत येणार आहेत.

---

## शिवाजी विद्यापीठाला देणगी

वारणा सहकारी साखर कारखान्यानें शिवाजी विद्यापीठाला १ लाख, २५ हजार रुपयांची देणगी देण्याचें ठरविलें आहे. ही देणगी ४ हप्त्यांत मिळून देण्यांत येणार आहे. येत्या जूनपासून वारणानगर येथें आर्ट्स व सायन्स कॉलेज स्थापन करण्यांत येणार असून तें शिवाजी विद्यापीठाला जोडण्यांत यावयाचें आहे.


# दि बेळगांव बँक लिमिटेड

( स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक )
रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

**संचालक मंडळ**

१. श्री. एस. व्ही. कलघटगी, चेअरमन.
२. श्री. बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल. बी., व्हाइस चेअरमन
३. श्री. एम. जी. हेरेकर
४. श्री. जी. व्ही. सराफ, बी. ए., एलएल. बी.
५. श्री. एस. एम. मुत्तुर
६. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एससी., एलएल. बी., मॅनेजिंग डायरेक्टर

श्री. एच. एस. कुलकर्णी, बी. ए., मॅनेजर.

**म्हैसूर राज्यांतील शाखा** — संकेश्वर, गोकाक, गोकाक फॉल्स, नंदगड, रामदुर्ग, चिकोडी, सौंदत्ती, बेळगांव, शहापूर-बेळगांव, ठळकवाडी-बेळगांव, नरगुंद, निपाणी, बैलहोंगळ, अथणी, कागवाड, बदामी, मुधोळ, हुबळी, हुकेरी, गुळेदगुड, राणिबेन्नुर.

**महाराष्ट्र राज्यांतील शाखा** — जयसिंगपूर, वेंगुर्ला, मालवण, गडहिंग्लज, शिरोडा, चिपळूण, कणकवली, मिरज, देवगड, सावंतवाडी, बार्शी, माधवनगर.

**ठेवींची रक्कम : रु. २ कोटी, ३५ लक्षांवर**

२ सर्व तऱ्हेचें बँकिंगचें काम केलें जातें.

# अर्थ

बुधवार, २० मे, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशीय चलनाचा उपयोग कसा केला जातो ?

भारताची अर्थव्यवस्था ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमापासून स्वयंनिर्मितिक्षम व्हावी आणि तिला परदेशांकडून मदत घ्यावी लागू नये, ह्यासाठी प्रयत्न करण्यांत येत आहे. भारताला निरनिराळ्या १९ परदेशांकडून मदत मिळत आलेली आहे. त्याशिवाय जागतिक बँक आणि तिची एक उपसंघटना, आंतरराष्ट्रीय विकास-मंडळ, ह्यांच्याकडून नेहमीं साह्य मिळत असते. अनेक ठिकाणांहून मिळणाऱ्या ह्या मदतीचा उपयोग पुरेपूर करून घेण्यांत आला तर ४ थ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारताची अर्थव्यवस्था स्वयंसिद्ध होईल, असा अभिप्राय तज्ज्ञांनीं व्यक्त केला आहे. परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीचा कसा उपयोग केला जातो ह्यावरच ध्येयपूर्ती अवलंबून आहे. ह्या संबंधींचें चित्र मात्र कांहींसें निराशाजनक आहे. १९६४ च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीपर्यंत परदेशांकडून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी मिळालेल्या मदतीपैकी ४४ टक्के मदतीचा उपयोग करून घेण्यांत आला असें आढळून आलें आहे. तिसऱ्या योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत मदतीचा उपयोग करण्याची गति बेताचीच होती. तिसऱ्या वर्षांत मात्र ही गति चांगली वाढलेली आहे. तरीसुद्धां अजून तींत बरीच वाढ व्हावयास हवी आहे. हिंदमधील बऱ्याच उद्योगधंद्यांना सध्यां परदेशीय चलनाचा तुटवडा भासत आहे. अशा परिस्थितींत उपलब्ध झालेल्या परकीय मदतीचा जास्तींत जास्त वेगानें उपयोग करून घेतला तरच देशाची अर्थव्यवस्था १९६६ सालापासून स्वयंसिद्ध होण्याच्या मार्गावर पावलें टाकू लागेल. परदेशांकडून आर्थिक साह्य मिळविणें कठीण होत चाललेलें आहे. त्यामुळें तर उपलब्ध मदतीचा जलद उपयोग करणें अधिकच महत्त्वाचें झालें आहे.

---

## वृद्धांना वेतन देण्याची योजना

गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील एकत्र कुटुंबपद्धति मोडकळीस येऊन ढासळून पडलेली आहे. त्यामुळें वृद्धांच्या योगक्षेमाच्या प्रश्नानें तीव्र स्वरूप धारण केलेलें आहे. काम करण्यास असमर्थ असणाऱ्या माणसांची चरितार्थाची सोय करण्याची कल्पना कल्याणकारी राज्यांत गृहीतच धरलेली असते. ह्या कल्पनेस अनुसरून वृद्धवेतनाची पद्धत आतापर्यंत आंध्र प्रदेश, केरळ, मद्रास, पंजाब व उत्तरप्रदेश ह्या राज्यांनीं अमलांत आणलेली आहे. आतां मध्यवर्ती सरकारहि वृद्धवेतनाची एक योजना अंमलांत आणण्याचा विचार करीत आहे. हे वेतन दरमहा २० रुपयांचें राहील आणि ते ६५ वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्यांनाच मिळूं शकेल. तथापि जे वृद्ध अपंग असतील त्यांना ही योजना ६० व्या वर्षापासूनच लागू करण्यांत येईल. योजनेसाठी येणाऱ्या खर्चापैकी निम्मा खर्च मध्यवर्ती सरकार सोसेल. योजनेची अंमलबजावणी राज्यसरकारांमार्फत होईल आणि तिचा निम्मा खर्चहि तीं सरकारें सोसतील. भारताच्या लोकसंख्येंत ६५ वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्यांची संख्या १० टक्के असावी असा अंदाज आहे. ह्याचा अर्थ १९६४-६५ सालीं योजनेचा खर्च भागविण्यासाठी २९ कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. पुढील वर्षी हा खर्च ३० कोटींच्या घरांत जाईल. ४ थ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत दरवर्षी ३२ कोटी रुपये ह्या हिशोबानें १६० कोटी रुपये खर्च करावे लागतील. ह्यापैकी १५ कोटी रुपये रक्कम मध्यवर्ती सरकार दरसाल खर्च करील. वृद्धवेतनाची रक्कम मनीऑर्डरनें पाठविण्यांत येईल. त्यावर वृद्धवेतन असा तांबडा शिक्का ठळकपणें मारला जाईल.

---

## बोलपटांच्या निर्यातीसाठी कॉर्पोरेशन

भारताची निर्यात वाढवून परदेशीय चलन मिळविण्यासाठी अनेक निर्यात-मंडळें स्थापन करण्यांत आलेलीं आहेत. निर्यात वाढून परदेशीय चलन ज्या मानाने उपलब्ध होईल त्या मानानें परदेशांकडून घेण्यांत येत असलेल्या कर्जाची जरूरी कमी कमी होत जाणार आहे. त्या दृष्टीनें भारतामधील बोलपट परदेशांत दाखविण्यासाठी करण्यांत येणाऱ्या प्रयत्नांना महत्त्वाचें स्थान आहे. हिंदी बोलपट परदेशी निर्यात करण्यास जोराची चालना देण्यासाठी इंडिअन मोशन पिक्चर्स एक्स्पोर्ट कॉर्पोरेशन ही संघटना उभारण्यांत आलेली आहे. ही संघटना उत्कृष्ट चित्रपट निर्माण करणाऱ्या निर्मात्यांचा पाठिंबा मिळवून त्यांच्याकडून निवडक चित्रपट परदेशी दाखविण्याचे हक्क मिळविणार आहे. चित्रपट दाखविण्यासाठी व त्या संबंधींचें इतर कामकाज पाहाण्यासाठी संघटना परदेशांत स्वतःचे एजंटसुद्धा नेमणार आहे. परदेशी दाखवावयाच्या बोलपटांची निवड करण्यासाठी संघटनेनें मुंबई, मद्रास आणि कलकत्ता ह्या ठिकाणीं कमिट्या नेमल्या आहेत. मुंबई येथील कमिटीच्या आतांपर्यंत बऱ्याच बैठकीहि झाल्या असून नुकत्याच तयार करण्यांत आलेल्या ७ बोलपटांची निवडहि कमिटीनें केली आहे. स्वीडनमध्यें भरविण्यांत यावयाच्या भारतीय चित्रपट-प्रदर्शनासाठीहि ११ बोलपटांची निवड करण्यांत आली आहे. संघटनेच्या ह्या प्रयत्नांना यश येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. कारण १९६३-६४ ह्या वर्षाच्या पहिल्या १० महिन्यांत बोलपटांच्या निर्यातीमुळें मिळालेलें परदेशीय चलन त्यामागील सालीं मिळालेल्या चलनापेक्षा अधिक आहे.

---

## हिंदी रिक्शावाला आणि अमेरिकन प्रवासी

" माझ्या पैशाच्या पाकिटांत ५०० डॉलर्सचे, म्हणजे सुमारें २,५०० रु.चे ट्रॅव्हलर्स चेक्स होते. आणखी कांहीं रोख रक्कमहि होती. माझी रिक्षा ओढणारा बिचारा केवळ चार आण्यांसाठी उन्हांत, अनवाणी धापा टाकीत होता; माझ्या खिशांतील पैसे त्याच्या कितीतरी वर्षांच्या मिळकतीइतके होते. आम्हा दोघांतील ह्या तफावतीचें कारण, भारतांतील माणसांची झालेली दुर्दशा हें मुख्यतः नसून अमेरिकेंत आम्हीं केलेली प्रगति हें आहे, असें मला वाटलें. "

—एक अमेरिकन प्रवासी

## दुकानांत चेक्सनें खरेदी

चेकनें पैसे देणाराला दुकानदार आपला चेक पत्करील किंवा नाहीं ह्याची खात्री नसते; त्यामुळें बँकिंगचा प्रसार होण्यास अडथळा येतो. बडीं दुकानें चेक वसूल होईपर्यंत माल घरीं पाठवीत नाहींत. ह्या दोन टोकांमधील दुकानें चेक स्वीकारतांना ओळख मागतात. ही ओळख पुष्कळ वेळां कुचकामाची असूं शकते. कांहीं दुकानदार चेकच्या पाठीवर चेक देणारांना नांव व पत्ता लिहायला सांगतात. फसवेगिरीला प्रतिबंध व्हावा, हा त्याचा उद्देश नसतो, तर चेक लिहितांना चूक झाली असेल तर चेक देणारा सांपडावा एवढाच असतो.

अमेरिकेंत बहुतेक चेक्सवर मालकाचें नांवच छापलेलें असतें. अमेरिकन लोकांच्या खिशांत त्यांचा ड्रायव्हिंग लायसेन्स असतो. आणि तो काढून दाखविण्याची त्यांना संवय असते. लायसेन्सवर त्यांची सही असते, चेकवरील नाव लायसेन्सवरील नांवाशीं ताडून बघता येतें. चेकवर डोळ्यांदेखत सही करायला सांगितल्यावर सर्व कांहीं ठीक आहे, असें मानण्यास भरपूर जागा असते. अमेरिकेच्या मानानें भारतांत मोटर मालक अत्यल्प असल्यामुळें, बँकांनींच खातेदारांना ' आयडेंटी कार्ड ' ( ओळख पत्रकें ) द्यावीं; त्यामुळें गिऱ्हाइकें, दुकानदार आणि बँका ह्या सर्वांचीच सोय होईल.

---

## तागाच्या गिरण्यांची यंत्रसामग्री

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस तागाच्या गिरण्यांना लागणारी सर्व यंत्रसामग्री भारतांत तयार होऊं लागेल. १९६२-६३ सालीं तागाच्या गिरणीच्या यंत्रसामग्रीच्या उत्पादनांत वाढ होऊन तें ३०९ लाख रुपयांच्या घरांत गेलें, त्या मागील सालीं २११ लाख रुपयांची यंत्रसामग्री तयार करण्यांत आली होती. १९६२-६३ सालीं तागाच्या मालाच्या निर्यातीसाठी ठरविण्यांत आलेलें उद्दिष्ट जवळ जवळ गांठण्यांत आलें. या वर्षी ९ लाख टन तागाचा माल निर्यात करण्यांत आला. त्याची किंमत १६० कोटी रुपये भरली. तागाच्या गिरण्यांत अद्ययावत् यंत्रसामग्री बसविण्याच्या कामीं चांगली प्रगति झाली आहे.

---

## निराश्रितांच्या पुनर्वसनासाठी जमीन

पूर्व पाकिस्तानांतून भारतांत आलेल्या निराश्रितांच्या पुनर्वसनासाठी मध्यप्रदेशांतील भिंड व मोरेना जिल्ह्यांतील ४५ हजार एकर जमीन वसाहतीसाठी योग्य करण्याची योजना राज्यसरकारनें तयार केली आहे. ह्या योजनेचा भारत सरकार सध्यां विचार करीत आहे. मध्यप्रदेश सरकारनें ६ हजार निर्वासित कुटुंबांची ह्या नव्या वसाहतींत सोय करण्याची तयारी दाखविली आहे. योजना अमलांत आणली गेल्यास निराश्रितांना रोजगार तर उपलब्ध होईलच; पण त्याशिवाय लागवडीसाठी नवीन जमीन मिळून दरसाल ३ हजार टन अन्नधान्याचें उत्पादनहि होऊं शकेल. भिंड आणि मोरेना जिल्ह्यांतील दरोडेखोरांचा उपद्रवहि नव्या वसाहतीमुळें कमी होईल. योजना अमलांत आणण्यासाठी ६ कोटी रुपये खर्च करावा लागेल.

---

## काश्मीर खटल्याचा खर्च

शेख अब्दुल्ला प्रभृतींवरील खटल्यासाठी मार्च, १९६३ अखेर भारत सरकारला ३१·५४ लक्ष रुपये खर्च आला.

---


श्री· वा· काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?




बेडेकर
मसाले, लोणचीं
व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील.
वापरून पाहा·
रुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

PENSION COLLECTION? NO PROBLEM...

Since grandfather opened his account with the Bank of Maharashtra getting his pension is no problem. It is like any other banking operation. Contact any Agent of the Bank of Maharashtra who will be happy to give you all information.

THE BANK OF MAHARASHTRA LTD.

Thorle Bajirao Road, Poona-2.



# Co-operative Training Centre, Poona-5.

Result of the examination for the Higher Diploma in Co-operation for session 1963–64.

**Excellent :** P. G. Borshe (711 marks). W. B. Bokare (704 marks).

**Very Good :** M. A. Deshmukh, R. B. Patil, B. T. Bhagat, V. D. Wadekar, D. S. Babar, N. V. Sontakke, V. S. Mali, V. S Hardikar, V.K. Khedkar, V. V. Vani, S. L. Patil.

**Good :** S. B. Chaugule, V. S. Jadbav, K. G. Shimpi, Y. R. Deshmukh, Y. K. Chaudhari, C. B. Pande, R. P. Deshmukh, M. G. Deshpande J. D. Arjunwadkar, M. R. Adkine, T. L. Birhate, M. T. Pappu, G. K. Pendse, S. N. Hatolkar, S. S. Patil, A. H. Mohod, R. S. Rode, K. B Bhalerao, M. D. Pitre, S. S. Kadwe, B. R. Deshmukh, G. A. Patwardhan, G. B. Doiphode, S. B. Yande, J. K. Sonawani.

**Fair :** G. N. Majge, S. R. Mahajan, V. B. Prabhugaonkar, M. T. Khardekar, S. R. Nayadu, K. P. Kamath, V. S. S. Mudaliar, S, A. Wadd, M. A. Ghosalkar, K. N. Tamhankar, S. N. Bhosale, K. G. Marwadi, M. J. Khorate, S. S. Bule, V. P. Karmarkar, R. V. Mantri, S. N. Vanarase, S. G. Tungare, V. D. Tadwalkar, R. H. Thorat, A. N. Quereshirepeater.

**The Best Trainee Prize**

Shri. P. G. Borshe has been awarded "Principal P. M. Chengappa" cash-prize of Rs. 50/- as the bes ttrainee for the 1963–64 session.

**N. Y. Kher**
*Principal.*

## सार्वजनिक उद्योगधंद्यांतील पगारमान

सार्वजनिक मालकीच्या विभागांतील उद्योगधंद्यांतील कामगारांच्या वेतनाची वाढ करण्यापूर्वी त्यासंबंधीची माहिती भारत-सरकारच्या अर्थखात्याला देण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें आहे. अलीकडेच इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशननें आपल्या चौथ्या वर्गांतील कमी वेतन मिळणाऱ्या नौकरांच्या वेतनांत वाढ करण्याचा निर्णय घेतला. ह्या निर्णयामुळें कॉर्पोरेशनला दरसाल ५० लाख रुपये वेतनापोटीं अधिक द्यावे लागतील. कॉर्पोरेशनचा हा निर्णय भारत-सरकारच्या मंत्रिमंडळापुढें मंजुरीसाठी आला असता असें आढळून आलें कीं त्याबद्दल अर्थखात्याचा कोणत्याहि प्रकारचा सल्ला घेण्यांत आला नव्हता.

## बंदराच्या खर्चांत वाढ

ओरिसांतील पटदीप बंदराच्या विकासासाठी १२·२२ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला होता. पण ह्या खर्चांत आतां आणखी ८ कोटी रुपयांची वाढ होणार आहे. ओरिसांतील लोखंडाचे खनिज जपानला निर्यात करण्यासाठी ह्या बंदराचा मुख्यत: उपयोग करण्यांत येणार आहे. विकासाच्या कामांत जपानचे तांत्रिक साह्य घेण्यांत येत आहे.

## झेक सरकारची आर्थिक मदत

कांहीं नव्या औद्योगिक प्रकल्पांची उभारणी करण्यासाठी झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारनें भारताला ४० कोटी रुपयांचें दुसरें कर्ज देऊं केलें आहे. ह्यापूर्वी २३ कोटी रुपयांचें कर्ज देण्यांत आलें होतें आणि त्याचा उपयोगहि करण्यांत आलेला होता. नव्या कर्जावर २·५ टक्के व्याज आकारण्यांत येणार असून तें १२ वर्षांत परत करावयाचें आहे. परतफेड रुपयाच्या चलनांत करावयाची आहे. कर्जाचा उपयोग करून उभारावयाच्या उद्योगधंद्यांत दोन यांत्रिक हत्यारांचे कारखाने आणि एक विद्युत्‌निर्मितीकेंद्र ह्यांचा समावेश आहे. त्याशिवाय १४ कोटी रुपयांचे सुटे भाग आयात करण्यासाठीहि कर्ज वापरण्यांत येणार आहे.

## नाइल नदीकिनारीं नवें हॉलिवुड

बोलपट निर्मितीचे आगर म्हणून अमेरिकेंतील हॉलिवुड जगप्रसिद्ध आहे. पण अलीकडे पुष्कळसे अमेरिकन निर्माते रोमसारख्या परदेशांतील ठिकाणीं चित्रपट निर्मिति करतांना दिसतात. ह्याचें कारण अमेरिकेंत निर्मिति करण्यापेक्षा बाहेर निर्मिति करणें स्वस्त पडते; आणि शिवाय अमेरिकेंत द्यावे लागणारें जबर स्थानिक करहि वांचतात. ही गोष्ट लक्षांत घेऊनच कीं काय इजिप्तमध्यें नाइल नदीच्या तीरावर फिल्म-निर्मितीसाठीं एक प्रचंड नगर उभारण्यांत येणार आहे. तें उभारण्यासाठीं ९० लाख पौंड खर्च येणार आहे. परंतु, परदेशांतील निर्मात्यांनीं तेथें चित्रपटनिर्मिति करण्यास प्रारंभ केल्यावर इजिप्तला कितीतरी अधिक पटीनें परदेशीय चलनाची प्राप्ति होईल. नवीन चित्रपटनगर पिरॅमिडस् नजिक उभारण्यांत येणार आहे. त्यांत बोलपट निर्मितीसाठी ९ स्टुडिओंची सोय करण्यांत येईल.

## लंघन-चिकित्सेचा रशिआंत प्रसार

अंतराळयानांतून भ्रमण करतांना योगिक पद्धतीनें श्वास निरोधन करण्याचा कांहीं उपयोग होईल किंवा काय ह्याचा विचार रशिअन शास्त्रज्ञ करीत होते. ह्या बाबतींत रशिअन लोकांच्या आस्थेचा पुरावा मिळालेला नाहीं. तथापि रोगमुक्त होण्यासाठी उपासाचा उपयोग मात्र रशिआंत सुरू झालेला आहे. उपासाचा उपयोग करून औषधोपचार करणारीं कांहीं केंद्रें रशिआंत सुरू करण्यांत आलेलीं आहेत. रशिअन डॉक्टरांच्या मतानें रूढ उपचार चालू असतांच रोग्यानें लंघन केल्यास तो कित्येक गंभीर आजारांतून लवकर मुक्त होतो. लंघनाबरोबरच बाष्पस्नान, सूर्यस्नान, मातीचे पोटिस, मर्दन इत्यादि उपचारांचाहि उपयोग डॉक्टर्स करू लागले आहेत. लंघनाच्या पहिल्या तीन दिवसांनंतर तें सुखप्रद होतें, असें रशिअन डॉक्टर्स रोग्यांना सांगत असतात.

**साठे बिस्किटांची निर्गत**—३१ मार्च, १९६४ अखेरच्या तिमाहींत साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि. नें १९,००० रु. च्या बिस्किटांची आणि १७,७०० रु. च्या कोको बटरची निर्गत केली.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### हिंदी चित्रपटांना जर्मनींत बाजारपेठ

पश्चिम जर्मनींतील हिंदी राजप्रतिनिधीनें केलेल्या पहाणीवरून असें दिसून आलें आहे कीं, उत्कृष्ट हिंदी बोलपट दाखविले गेल्यास ते तेथें चांगले लोकप्रिय होतील. खुद्द जर्मनींत हिंदी बोलपट निर्यात करण्याच्या मार्गांत विशेष अडचणी नाहींत. दर १०० मीटर फिल्मवर १,६८० रुपये जकात द्यावी लागते, आणि त्याशिवाय उलाढालीवर ६ टक्के कर द्यावा लागतो. हिंदी फिल्म्स जर्मनींत दाखविण्यापूर्वी त्यांना जर्मन भाषेंतील आवाज द्यावा लागतो. हिंदी चित्रपट निर्यात करण्याच्या कामीं ही अडचण मात्र चांगलीच भासते. जर्मन भाषेंतील आवाज देण्यासाठीं नेहमींच्या लांबीच्या हिंदी फिल्मवर ८४ हजार रुपये खर्च करावे लागतात. त्यामुळें ज्या बोलपटांच्या यशाची खात्री असेल अशाच हिंदी बोलपटांवर इतका खर्च करण्याची तयारी जर्मन वितरक दाखवितात.

### पिण्याच्या पाण्याची सोय नाहीं

महाराष्ट्रामधील जवळ जवळ ९ हजार खेड्यांत पिण्याचें पाणी मिळण्याची सोय नाहीं. त्यांना ही सोय उपलब्ध करून देण्यासाठीं सुमारें २० कोटी रुपये खर्च करावे लागतील असा अंदाज आहे. राज्यांतील जिल्हा परिषदांना राज्यसरकारनें ह्या बाबतींत कांहीं अधिकार दिले आहेत. शेतीसाठी व पिण्यासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या १ लाख रुपयांपर्यंत खर्च येणाऱ्या योजना जिल्हा परिषदांना मंजूर करतां येतात. त्याशिवाय सुपरिंटेंडिंग एंजिनिअर्सना ५ लाख रुपयांपर्यंतचीं कामें मंजूर करतां येतात. विदर्भांतील ज्या भागांत मचुळ पाणी लागतें त्या भागांत पिण्याच्या पाण्यासाठीं नलिका विहिरी खोदण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. अशा प्रकारच्या कांहीं विहिरींना चांगलें पाणी लागलें असून त्यांचा फायदा ४० गांवें घेत आहेत.

### कोयाली येथील तेलकारखाना

गुजरातमधील कोयाली येथें उभारण्यांत आलेल्या तेलशुद्धीच्या कारखान्याचा विस्तार करण्यांत येणार आहे. त्या संबंधींचे नकाशे रशिअन तज्ज्ञांनीं तयार केले आहेत. विस्ताराचें काम पूर्ण झाल्यावर कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता २० लाख टनांवरून ३० लाख टनांपर्यंत वाढेल आणि कारखान्याचा व्यापहि बराच वाढेल. कलोलजवळ सांपडलेल्या तेलखाणींतील तेल कारखान्यांत शुद्ध करण्यांत येणार आहे. खाणीपासून काढण्यांत येणारें अशुद्ध तेल नळांच्या साह्यानें कारखान्यांत पोचविण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. कारखान्यांत मुख्यतः विमानांना लागणारें इंधन निर्माण करण्यांत येईल. सुमारें १ लाख, ५० हजार टन तेल निर्माण करण्यांत येणार आहे.

### सर जहांगीर गांधींची सेवानिवृत्ति


टाटा आयर्न अँड स्टील कंपनी लि. चे डायरेक्टर-इन-चार्ज, सर जहांगीर गांधी, हे ४७ वर्षांच्या सेवेनंतर १ एप्रिल, १९६४ रोजीं निवृत्त झाले. डायरेक्टर-इन-चार्ज ही जागा आतां रद्द करण्यांत आली असून त्याऐवजीं दोन रेसिडेंट डायरेक्टर्सची नेमणूक करण्यांत आली आहे.

### भांडवलदार देशांशीं व्यापार करण्यास अनुकूलता

पश्चिम युरोपच्या सामायिक बाजारपेठेंत सामील झालेल्या देशांप्रमाणेंच पूर्व युरोपांतील देशांचीहि एक संयुक्त संघटना रशियाच्या नेतृत्वाखालीं आहे. ह्या संघटनेचा १५ वा वर्षदिन नुकताच साजरा करण्यांत आला. भांडवलशाही देशांशीं व्यापार करण्यास व अप्रगत देशांना मदत करण्यास ह्या संघटनेनें अनुकूलता दर्शविली आहे.


माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्ट
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९.९९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १४.०४ " |
| ठेवी | रु. | ३९९.४४ " |
| खेळतें भांडवल | रु. | ४३७.२७ " |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.




स्थापना १९१८

ALCO

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

## १९६३ मधील बँकिंगचा आढावा

### लिक्विडिटीचें प्रमाण

बँकिंग कंपन्यांच्या दुरुस्त कायद्याप्रमाणें बँकांनीं आपल्या लिक्विडिटीचें प्रमाण २८% पर्यंत वाढविलें पाहिजे. १६ सप्टेंबर १९६४ च्या आंत हें प्रमाण त्यांनीं गांठलें पाहिजे. तथापि, ७९ शेड्यूल्ड बँकांपैकी १६ शेड्यूल्ड बँकांचें लिक्विडिटीचें प्रमाण डिसेंबर, १९६३ अखेर २८% पेक्षा कमी होतें. ठेवींच्या मानानें कर्जे अयोग्य प्रमाणांत देण्याचा हा परिणाम आहे. बँकांची ठेवीसाठी स्पर्धा चालू आहे, तिचा हेतु ठेवी वाढवून लिक्विडिटीचें प्रमाण वाढविणें हाच आहे.

### वाढलेले नफे : कारणमीमांसा

१९६२ चे मानानें १९६३ सालीं बँकांचे नफे बरेच वाढले आहेत. कर्जावरील व्याजाचे दरांत वाढ हें त्याचें प्रमुख कारण आहे. ६% जास्त दराच्या कर्जाचें एकूण कर्जाशीं प्रमाण १९६२ सालीं ५३·८% होतें, तें १९६३ सालीं ८५·४% झालें. एकूण कर्जातहि ९% वाढ झाली.

### ठेवींत व कर्जांत वाढ

१९६३ सालीं ठेवींत २८३ कोटी रु. ची भर पडली; १९६२ सालीं ठेवी २३३ कोटी रु. नीं वाढल्या होत्या. कर्जांत १५९ कोटी रु. ची वाढ झाली; १९६२ सालीं १४५ कोटी रु. ची वाढ झाली होती.

### विलिनीकरण : ठेवींची परतफेड

सप्टेंबर, १९६० पासून आतांपर्यंत ३२ बँकांचें इतर बँकांत विलिनीकरण झालें आहे. त्यांपैकी २० बँकांच्या ठेवीदारांना ठेवींच्या १००% रक्कम मिळाली; १० बँकांच्या ठेवीदारांना ३६% ते ९२% रक्कम मिळाली.

### लायसेन्स

१९६३ सालीं दोन शेड्यूल्ड बँकांना आणि तीन बिगर-शेड्यूल्ड बँकांना लायसेन्स देण्यांत आलीं. १९६३ अखेर ७६ बँकांना लायसेन्स मिळालें आहे; आतांपर्यंत १४७ बँकांना लायसेन्स नाकारलें असून १९४ बँकांच्या अर्जांचा विचार अजून चालू आहे.

### ठेवींचा विमा

१९६३ अखेर विमा उतरलेल्या बँकांची संख्या २५० होती. त्यांचेकडील ८५·९ लक्ष खात्यांपैकी ६६·५ लक्ष खात्यांत १,५०० रु. पेक्षा कमी रक्कम होती; त्या सर्वांना विम्याचें संपूर्ण संरक्षण होतें. आतांपर्यंत तीन बँकांचे बाबतींत डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनवर जबाबदारी आली—बँक ऑफ चायना, युनिटी बँक लि. आणि दि बँक ऑफ अलगापुरी.

### नव्या शाखा

१९५४ पासून आतांपर्यंत बँकांनीं एकूण २,३७३ नव्या शाखा उघडल्या. म्हणजे, वार्षिक वाढ २३७ शाखांची झाली. १९६३ अखेर शेड्यूल्ड बँकांच्या ५,०३२ आणि बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या ५१० शाखा आहेत.

---

### पीकिंगमध्यें ब्रिटिश औद्योगिक प्रदर्शन

येत्या नोव्हेंबर महिन्यांत पीकिंग येथें ब्रिटिश औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. चीनचें रशियाशीं बिनसलें आहे, ही ग्रेट ब्रिटनला एक सुसंधि वाटत आहे. ब्रिटिश मालाला चीनमध्यें चांगली बाजारपेठ मिळेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

### स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि.

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि. नें डिव्हिडंडचा दर ६% चा ९% केला आहे. १९६३ सालीं कंपनीनें २·०२ कोटि रुपयांची विक्री केली; म्हणजे १९६२ चे मानानें त्यांत ८०% वाढ झाली. ठोक नफा ५०% वाढून १५·५० लक्ष रु. चा २२·८० लक्ष रु. झाला. कंपनीला ३० लक्ष बूट जोड्या करण्याची परवानगी मिळाली आहे. १९६५ चे मध्यास त्यांच्या उत्पादनास प्रारंभ होईल. कंपनीचा माल आतां निर्गत होऊं लागला आहे.

---

### डच तरुणांची मदत संघटना

हॉलंडमधील एका ग्रामीण तरुणांच्या संघटनेनें भारताला मदत देण्यासाठी कमिटी स्थापन केली आहे. कमिटीतर्फे भारतामधील शेतकरी तरुणांना साह्य करण्यासाठी डच तरुण पाठविण्यांत येणार आहेत. हे तरुण भारतांत १२ ते १८ महिने राहतील. डच शेतकरी तरुणांची पहिली तुकडी येत्या सप्टेंबर महिन्यांत भारताला येण्यासाठी निघेल. पूर्वेकडील देशांतील हवापाण्याची संवय करण्याच्या दृष्टीनें ही तुकडी इस्राएल देशांत कांहीं दिवस घालवील. भारतांत येण्यापूर्वी डच तरुणांना येथील ग्रामीण जीवनाची माहिती करून देण्यांत येईल. त्यासाठी एक स्वतंत्र अभ्यासक्रमच आखण्यांत आला आहे. भारतामधील ८ तरुण शेतकऱ्यांना हॉलंडमध्यें नेऊन तेथील ग्रामीण जीवनाची ओळख डच संघटना करून देणार आहे.

---

### श्री. सदाशिवन्, यु. क. बँकेचे डायरेक्टर

युनायटेड कमर्शिअल बँक लि. चे जनरल मॅनेजर, श्री. एस. टी. सदाशिवन् हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. जानेवारी, १९४५ मध्यें ते डेप्युटी मॅनेजर ह्या नात्यानें बँकेंत आले. मे, १९५५ मध्यें त्यांना जनरल मॅनेजर नेमण्यांत आलें. ते सेवानिवृत्त होत असले, तरी त्यांना बँकेचे डायरेक्टर करण्यांत येत आहे. डेप्युटी जनरल मॅनेजर, श्री. आर. बी शहा हे आतां जनरल मॅनेजर होत आहेत.

---

### कामाच्या दप्तरांचे पर्वत

गेल्या तीन वर्षांत मध्यवर्ती सरकारच्या खात्यांनीं १० लाख कामकाजाचीं दप्तरें रद्द ठरविलीं आहेत. तरीहि अजून ३२ लाख दप्तरांबाबत तपासणी होण्याचें राहिलेंच आहे. हीं दप्तरें ठेवण्यासाठी ज्या शिड्या आहेत, त्यांची लांबी ३० मैल भरेल. भारत सरकारच्या सर्व खात्यांतील कागदपत्र ठेवण्याच्या शिड्यांची लांबी १२५ मैल होईल. ऐतिहासिक कागदपत्रांच्यापेक्षा ह्या दप्तरांचा ढिगारा १० पटीनें मोठा आहे.

---

### गरिबी आणि श्रीमंती

जीवनांत समानता क्वचितच असते. युद्धांत कांहीं जण मृत्यु पावतात, कांहीं जखमी होतात, तर कांहींना घर सोडावेंहि लागत नाहीं. दारिद्र्याचेंहि तसेंच आहे. भारतांतील खेड्यांत एखाद्याला हजार बाराशे रुपये दरमहा मिळाले, तर तो श्रीमंत गणला जाईल. अमेरिकेंत तो दरिद्री समजला जाईल. ज्याला दरमहा अडीच हजार रुपयांपेक्षा कमी प्राप्ति आहे, अशाला अमेरिकेंत गरीब म्हणतात. तो खेड्यांत रहातो का शहरांत रहातो, ह्यावरहि हें अवलंबून आहे.

## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

**: मुख्य कचेरी :**
९, बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५,
२५६२१४

**: विभागीय कचेरी :**
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता :
फार्मर बँक

**: बृहन्मुंबईतील शाखा :**

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ७५ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४१ लाख |
| ठेवी | ... | २१ कोटी ६३ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६७ कोटी ८७ लाख |

**महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

**संरक्षण निधीच्या रकमा या बँकेंत स्वीकारल्या जातात.**



## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

**शेड्यूल्ड बँक**

**हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.**

टेलिफोन नं. ६४ ] **स्थापना १९३६** [ तारेचा पत्ता:–युवर बँक

**—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—**

**सेव्हिंग्ज् बँक:–३ टक्के**

**मुदत ठेवी**

**१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षें–४½ टक्के, ३ वर्षें–४¾ टक्के, ४ वर्षें–५ टक्के, ५ वर्षें–५¼ टक्के.**

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेंचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा–विस्तार**

शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केटयार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१–१२–१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

**सी. ह. जोशी,**
बी. ए., बी. कॉम.,
*जनरल मॅनेजर.*

**रा. ना. गोडबोले,**
बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी.
*चेअरमन.*





शीतल, झुळझुळीत,
आणि वापरायला
अत्यंत मनोरम व सुखद

## ठाकरसी

फॅब्रिक्स।
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती

या कापडावर असें लेबल असतें
SANFORIZED

THACKERSEY FABRICS

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स**

- धी हिंदुस्तान स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्स कंपनी लिमिटेड
- धी क्राऊन स्पिनिंग अँड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.